ePaper

# ...अन्यथा बॉम्ब हल्ल्यांसाठी तयार राहा”; अमेरिकेचा इराणला थेट इशारा



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™



पान 3 वरुन...

‘बटरफ्लाय गार्डन’मुळे थेरगावच्या वैभवात पडणार भर!

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 17 एप्रिल 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## 33% आरक्षणाचा गेमचेंजर कायदा महिलांच्या हिताचा

# राजकारणात नारीशक्तीचा आता सत्तेवर हक्क!

महाईन्यूज।
नवी दिल्ली

**भारतीय राजकारणाच्या इतिहासात आजवर अनेक निर्णायक क्षण आले आहेत. संविधान सभेपासून ते आजच्या संसदेपर्यंत महिलांनी नेहमीच देशाच्या भविष्य घडवण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. संविधान सभेत एकूण १५ महिला सदस्य होत्या. त्या सर्वांनी संविधानाच्या मसुद्याला आकार देण्यात आणि राष्ट्राच्या भविष्यातील स्वप्नांना वास्तवात उतरवण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यानंतरच्या काळात महिलांनी संसदेत प्रवेश केला.**

केंद्र सरकारने २०२३ मध्ये हा कायदा पारित करून महिलांना लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये ३३ टक्के आरक्षण देण्याचा मार्ग मोकळा केला होता. केंद्रीय कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी लोकसभेत नारी शक्ति वंदन अधिनियम संविधान संशोधन विधेयक २०२३ सादर केले आहे. या संशोधनामुळे हा आरक्षणाचा कायदा २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत प्रत्यक्ष लागू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यापूर्वी २०२६ च्या जनगणनेच्या आधारे हा कायदा अमलात आणण्याचे नियोजन होते. मात्र आता २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीचा वापर करून आरक्षण लागू करण्यासाठी सरकारने बदल केले आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या विधेयकाला संसद आणि राज्यसभेत पास करण्यासाठी सर्व पक्षांच्या नेत्यांना पत्रे लिहिली होती. यामुळे सर्व पक्षांना एकत्र येऊन महिलांच्या हक्कासाठी पाऊले उचलण्याचे आवाहन करण्यात आले. मात्र विरोधकांनी स्पष्ट केले आहे की, ते महिला आरक्षणाच्या पूर्ण समर्थनात आहेत, पण २०११ च्या जनगणनेच्या आधारावर परिसीमन करण्यास विरोध आहे. विरोधकांची मागणी आहे की, सध्याच्या लोकसभा आणि विधानसभांच्या जागांच्या संख्येतच आरक्षण लागू करावे.






## ऐतिहासिक निर्णय

संविधान सभेतील १५ महिलांनी ज्या दूरदृष्टीने देशाच्या मूलभूत कायद्याला आकार दिला, त्याच दूरदृष्टीने आज हा कायदा महिलांच्या राजकीय प्रतिनिधित्वाला नवी दिशा देत आहे. सात दशकांच्या लोकशाही प्रवासात संसदेच्या रचनेत अनेक सुधारणा झाल्या. भारतीय स्त्रीशक्तीला सन्मान आणि समान हक्क देणारा ऐतिहासिक निर्णय आहे. २०२९ च्या निवडणुकीत हा कायदा लागू झाल्यास राजकारणाची तसेच देशाच्या भविष्याची दिशा बदलण्याची ताकद महिलांमध्ये येईल. संविधान सभेपासून सुरू झालेल्या महिलांच्या योगदानाचा हा सिलसिला आता अधिक उजळ आणि प्रभावी होईल. देशाच्या राजकारणात महिलांची संख्या वाढल्यास धोरणे अधिक समावेशक आणि संतुलित होतील. हा बदल फक्त जागा आरक्षित करण्यापुरता मर्यादित राहणार नाही, तर संपूर्ण राजकीय संस्कृतीत सकारात्मक परिवर्तन घडवेल.

## राजकारणात महिलांची संख्या वाढेल

महिला आरक्षण कायद्यामुळे देशाच्या राजकारणात महिलांची संख्या लक्षणीय वाढणार असून निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग अधिक बळकट होईल. ३३ टक्के आरक्षणामुळे लैंगिक समानतेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडणार असून महिलांना केवळ मतदार म्हणून नव्हे तर धोरणनिर्मिती व नेतृत्वाच्या भूमिकेत सक्रिय स्थान मिळेल. २०२३ मधील संविधान दुरुस्तीनंतर या कायद्याचा मार्ग मोकळा झाला असून, २०११ च्या जनगणनेच्या आधारे त्याची अंमलबजावणी लवकर करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. त्यामुळे २०२९ पूर्वीच महिलांना राजकीय प्रतिनिधित्वाची नवी संधी मिळून देशाच्या विकासात त्यांचा प्रभाव अधिक ठळकपणे दिसून येईल.

## नारी शक्ति वंदन अधिनियम काय आहे?

हा कायदा लागू झाल्यानंतर लोकसभा आणि राज्य विधानसभांमधील एकूण जागांपैकी ३३ टक्के जागा महिलांसाठी आरक्षित करण्यात येतील. सध्या लोकसभेत महिलांचे प्रतिनिधित्व केवळ १३.६ टक्के इतकेच आहे. हा आरक्षणाचा फायदा अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जनजाति (एसटी) साठी राखीव जागांनाही मिळणार आहे. आरक्षित जागा प्रत्येक निवडणुकीत बदलतील, कारण रोटेशन पद्धतीने त्यांचा निश्चय होईल. कायद्याला लोकसभा आणि राज्यसभेची मंजुरी मिळाल्यानंतर तो देशात लागू होईल आणि महिलांना आरक्षण मिळेल. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी परिसीमन (डिलिमिटेशन) प्रक्रिया आवश्यक आहे. त्यामुळे केंद्र सरकारने गुरुवारी (१६ एप्रिल) परिसीमन विधेयकही सादर केले आहे. याशिवाय केंद्र शासित प्रदेश कायदे (संशोधन) विधेयक २०२६, संविधान (१३१ वे संशोधन) विधेयक २०२६ आणि परिसीमन विधेयक २०२६ हे तीन महत्त्वाचे विधेयक १६ ते १८ एप्रिल दरम्यान संसदेच्या विशेष अधिवेशनात मंजूर झाल्यास २०२३ मध्ये पारित झालेल्या नारी शक्ति वंदन अधिनियमाला २०२९ च्या निवडणुकीत प्रत्यक्ष अंमलबजावणीचा मार्ग मोकळा होईल.

# ‘भाग्यलक्ष्मी प्रॉपर्टीज’ला उच्च न्यायालयाचा दणका!

## 3 भागीदारांवर अजामीनपात्र वॉरंट : गृहरचना संस्थेच्या अभिहस्तांतरणाच्या अटींचे पालन केले नाही

**महाईन्यूज । पुणे**

**गृहरचना संस्थेच्या अभिहस्तांतरणाच्या अटींचे पालन न केल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने पुण्यातील भाग्यलक्ष्मी प्रॉपर्टीज या विकासक कंपनीला मोठा दणका दिला आहे. न्यायालयाने कंपनीच्या सात भागीदारांपैकी तीन जणांविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट जारी करत कडक संदेश दिला आहे.**






न्यायालयाने ईश्वरचंद के. गोयल, विजयलक्ष्मी व्ही. अग्रवाल आणि मोहम्मदअली अस्लम हाजी या भागीदारांविरुद्ध ही कारवाई केली. कन्सेंट टर्मनुसार (संमती अटींनुसार) गृहरचना संस्थेच्या नावे अभिहस्तांतरण दस्त करून देणे आणि प्रकल्पातील वचनबद्ध सोयी-सुविधा पूर्ण करणे बंधनकारक होते. मात्र, या अटींचे पालन करण्यात विकासक अपयशी ठरल्याने न्यायालयाने कठोर भूमिका घेतली. हिंजवडीतील ‘एस्पिरिया’ प्रकल्पातील बहुतांश फ्लॅट्सची विक्री २०१२ मध्ये झाली होती. तरीही गृहरचना संस्था स्थापन करण्याची प्रक्रिया २०१६ पर्यंत लांबली. त्यानंतरही विकासकाने मंजूर आराखड्यात बदलांसाठी फ्लॅटधारकांची संमती मिळवण्याचा आग्रह धरत प्रक्रिया अडकवून ठेवली. २०१७ मध्ये विकासकाने एकतर्फी ‘डीड ऑफ डिक्लेरेशन’ आणि ‘अपार्टमेंट डीड’ नोंदवून घेतल्याचे उघड झाल्यावर रहिवाशांना मोठा धक्का बसला. सहकारी गृहरचना संस्था स्थापन करण्याची त्यांची इच्छा धुळीस मिळाली.

### न्यायालयीन लढा...

फ्लॅटधारकांनी अखेरीस न्यायालयीन लढा सुरू केला. प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात गेले आणि दोन्ही बाजूंमध्ये कन्सेंट टर्मवर समझोता झाला. विकासकाने संस्था स्थापन करून अभिहस्तांतरण करण्याचे मान्य केले, तर रहिवाशांनी प्रलंबित खटले मागे घेतले. मात्र, २०१९ नंतरही विकासकाने अटींची अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे रहिवासी पुन्हा अडचणीत सापडले. अखेरीस त्यांनी न्यायालयाच्या अवमान याचिकेचा मार्ग अवलंबला.

### न्यायालयाची कडक भूमिका

न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने भागीदारांना नोटीस बजावून इशारा दिला होता. तरीही १५ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या सुनावणीस संबंधित भागीदार गैरहजर राहिल्याने न्यायालयाने संताप व्यक्त करत अजामीनपात्र वॉरंट जारी केले. विकासकाच्या वकिलांनी ‘डीड ऑफ डिक्लेरेशन’मुळे हस्तांतरण शक्य नसल्याचा युक्तिवाद केला; मात्र न्यायालयाने तो फेटाळून लावत कठोर इशारा दिला.

> “विकासकांनी केलेल्या करारांचे आणि न्यायालयाच्या आदेशांचे पालन करणे ही केवळ कायदेशीर जबाबदारी नाही, तर ती नैतिक बांधिलकीदेखील आहे. गृहरचना संस्थांच्या अभिहस्तांतरणाचा हक्क हा स्पष्ट आणि संरक्षित आहे. जर हा हक्क डावलण्याचा प्रयत्न झाला, तर न्यायव्यवस्था निश्चितपणे हस्तक्षेप करते आणि योग्य न्याय मिळवून देते. सदनिका धारकांनी घाबरून न जाता एकजूट ठेवून आपल्या हक्कांसाठी लढा दिला, तर न्याय मिळवणे अशक्य नाही.
>
> - ॲड. सत्या मुळे, याचिकाकर्त्यांचे वकील.

### रहिवाशांमध्ये समाधानाची भावना

या निर्णयामुळे घरखरेदीदारांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी न्यायव्यवस्था कटिबद्ध असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे. “११ वर्षांनंतरही न्यायासाठीचा लढा सुरू आहे, पण आजचा निर्णय आमच्यासाठी मोठा दिलासा आहे,” अशी भावना सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. सत्या मुळे यांनी सांगितले की, “हस्तांतरण हा गृहरचना संस्थांचा वैधानिक हक्क आहे. विकासकांनी कायद्याला हलक्यात घेऊ नये. रहिवाशांनीही एकजूट दाखवत वेळेवर कायदेशीर पावले उचलणे गरजेचे आहे.”

# दीपाली हुलावळे यांच्याकडे ‘बांधकाम’, तर अमोल नलावडे ‘कृषी’ सभापती

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे जिल्हा परिषदेच्या विषय समित्यांच्या सभापती पदांचे गुरुवारी (दि. १६ एप्रिल) अधिकृतपणे वाटप करण्यात आले. यामध्ये मावळ तालुक्यातील दीपाली हुलावळे यांच्याकडे महत्त्वपूर्ण अशा बांधकाम व आरोग्य समितीची धुरा सोपवण्यात आली आहे, तर वेल्हे तालुक्यातील अमोल नलावडे यांची कृषी व पशुसंवर्धन समितीच्या सभापतीपदी वर्णी लागली आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी विशेष सर्वसाधारण सभेत या निवडी जाहीर केल्या.**




### अशी आहे नवी टीम

- विवेक वळसे-पाटील (उपाध्यक्ष): अर्थ, नियोजन आणि शिक्षण विभाग.
- दीपाली हुलावळे: बांधकाम आणि आरोग्य समिती.
- अमोल नलावडे: कृषी आणि पशुसंवर्धन समिती.
- अंकिता पाटील-ठाकरे: महिला व बालकल्याण समिती (पूर्वीच निवड).
- जितेंद्र बडेकर: समाजकल्याण समिती (पूर्वीच निवड).

उपाध्यक्ष विवेक वळसे-पाटील यांच्याकडे अर्थ व नियोजन आणि शिक्षण या महत्त्वाच्या विभागांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. गुरुवारी झालेल्या बैठकीत तीन सभापतींना प्रत्येकी दोन विषय समित्यांच्या सभापती पदाची जबाबदारी देण्यात आली. नवनिर्वाचित चार सभापतींची निवड २ एप्रिल रोजीच झाली होती, मात्र त्यांना खात्यांचे वाटप होणे बाकी होते. अखेर गुरुवारी यावर शिक्कामोर्तब झाले.

जिल्हा परिषदेच्या ६४ वर्षांच्या इतिहासात यंदा नवा विक्रम प्रस्थापित झाला आहे. १९६२ मध्ये जिल्हा परिषदेची स्थापना झाल्यापासून आजतागायत एकाही महिला सदस्याला बांधकाम व आरोग्य समितीच्या सभापतीपदी संधी मिळाली नव्हती. खडककाळे जिल्हा परिषद गटातून निवडून आलेल्या दीपाली हुलावळे यांना ही संधी देऊन जिल्हा परिषद प्रशासनाने महिलांना मोठे प्रतिनिधित्व दिले आहे. बांधकाम सभापती होण्याचा बहुमान मिळवणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत.

अध्यक्ष वीरधवल जगदाळे आणि उपाध्यक्ष विवेक वळसे-पाटील यांची यापूर्वीच बिनविरोध निवड झाली होती. गुरुवारपर्यंत उपाध्यक्ष व अन्य दोन पदाधिकारी बिनखात्याचे सभापती म्हणून कार्यरत होते.

या विशेष सभेला मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे आणि सर्व विभागांचे खातेप्रमुख उपस्थित होते. नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडीनंतर जिल्हा परिषदेच्या कामकाजाला आता अधिक गती मिळण्याची चिन्हे आहेत.

# ‘बटरफ्लाय गार्डन’मुळे थेरगावच्या वैभवात पडणार भर!

## स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्याकडून कामाची पाहणी

**महाईन्यूज ।** पिंपरी-चिंचवड

**उद्याने ही शहराचे वैभव असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासोबतच शहराचे सौंदर्य वाढविण्याचे काम करत असतात. याच पार्श्वभूमीवर थेरगाव प्रभाग क्रमांक २३ येथे साकारण्यात येत असलेल्या निसर्गरम्य ‘बटरफ्लाय गार्डन’च्या कामाची पिंपरी चिंचवड महापालिकेचे स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी आज महापालिका अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करून सविस्तर आढावा घेतला. गेल्या अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर आता या उद्यानाच्या कामाला मूर्त स्वरूप प्राप्त झाले असून सध्या हे काम प्रगतीपथावर आहे.**



> ”थेरगावचे हे बटरफ्लाय गार्डन शहराच्या सौंदर्यात भर टाकणारे ठरेल. नागरिकांना एक स्वच्छ, सुंदर आणि सुविधायुक्त विरंगुळा केंद्र उपलब्ध करून देणे हे आमचे कर्तव्य आहे. उद्यानाचे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याकडे आमचा कटाक्ष राहील.”
>
> – **अभिषेक बारणे,** सभापती, स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.

या पाहणी दौऱ्यादरम्यान सभापती अभिषेक बारणे यांनी नागरिकांसाठी हे उद्यान अधिक सुंदर, स्वच्छ आणि सुविधायुक्त व्हावे या दृष्टीने अधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. यामध्ये प्रामुख्याने महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय करणे, उद्यानातील झाडांची संख्या वाढवणे आणि परिसरातील ड्रेनेज लाईनची पाहणी करून योग्य नियोजन लावण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची उत्तम व्यवस्था, मुख्य प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक, पार्किंग आणि नियमित स्वच्छतेसाठी ठोस व्यवस्थापन प्रणाली (मेंटेनन्स शेड्युल) तयार करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. उद्यानामध्ये पक्षांना आकर्षित करणारी स्थानिक फुलझाडे आणि औषधी वनस्पतींची लागवड करण्यावरही त्यांनी भर दिला.

या प्रसंगी उद्यान अधीक्षक योगेश वाळुंज, सहाय्यक उद्यान अधीक्षक राजेश वसावे, उद्यान निरीक्षक सुनील नाळे, उद्यान सहाय्यक हनुमंत चाकणकर, उद्यान विभागाचे अरविंद कदम, उपअभियंता रमेश निवृत्ती जिंतीकर, कनिष्ठ अभियंता विकास दत्तात्रेय गोसावी यांच्यासह माजी स्वीकृत नगरसेवक संदीपजी गाडे व प्रभागातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. थेरगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणाऱ्या या उद्यानामुळे परिसरातील नागरिकांना लवकरच एक हक्काचे विरंगुळा केंद्र उपलब्ध होणार आहे.


---

# वायसीएम रुग्णालयातील उपाहारगृहात गंभीर गैरसोयी!

**महाईन्यूज ।** पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (YCM) रुग्णालयाच्या आवारातील उपाहारगृहातील सेवा आणि व्यवस्थापनाबाबत गंभीर गैरसोयी निर्माण झाल्याचा आरोप करत नगरसेविका योगिता नागरगोजे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तांकडे सविस्तर लेखी तक्रार दाखल केली आहे. या प्रकारामुळे रुग्ण, त्यांचे नातेवाईक तसेच काही कर्मचारी वर्गातही तीव्र नाराजी निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे.**



वायसीएम रुग्णालयात दररोज शहरासह ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणावर गरीब व गरजू रुग्ण उपचारासाठी येतात. अशा परिस्थितीत रुग्णालय परिसरात परवडणाऱ्या दरात भोजन व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उपाहारगृहाची सुविधा सुरू करण्यात आली आहे. मात्र, सद्यस्थितीत या उपाहारगृहाच्या कामकाजात अनेक त्रुटी असल्याचे तक्रारीत स्पष्ट करण्यात आले आहे.

> “वायसीएम रुग्णालयातील उपाहारगृहात रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मूलभूत सुविधा आणि परवडणारे भोजन मिळणे हा अधिकार आहे. शिवभोजन थाळी पुन्हा सुरू करणे, पिण्याच्या पाण्याची मोफत व्यवस्था आणि दर नियंत्रण या बाबतीत महापालिकेने तातडीने ठोस पावले उचलावीत. या विषयावर मी सतत पाठपुरावा करून नागरिकांना न्याय मिळवून देईन,”
>
> – **योगिता नागरगोजे,** नगरसेविका, भाजपा.

तक्रारीनुसार, उपाहारगृहाचे संचालन साई सेवा इंटरप्राईजेस या खासगी संस्थेकडे सोपविण्यात आले असून, या ठिकाणी पूर्वी उपलब्ध असलेली अत्यल्प दरातील “शिवभोजन थाळी” सेवा पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना बाहेरून महागड्या दरात अन्नपदार्थ खरेदी करावे लागत आहेत. रुग्णालय परिसरातच स्वस्त व सुलभ भोजन मिळणे अपेक्षित असताना ही सेवा बंद झाल्याने सामाजिक उद्दिष्टालाच बाधा निर्माण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### प्रशासन दखल घेणार का?

या पार्श्वभूमीवर नगरसेविका योगिता नागरगोजे यांनी पुढील उपाययोजना तातडीने करण्याची मागणी केली आहे. यामध्ये उपाहारगृहात बंद करण्यात आलेली शिवभोजन थाळी त्वरित पुन्हा सुरू करणे, अन्नपदार्थांचे दर परवडणारे व नियंत्रित ठेवणे, स्वच्छ व मोफत पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करणे, उपाहारगृहाच्या कामकाजावर नियमित देखरेख ठेवणे तसेच संबंधित ठेकेदार संस्थेच्या कामकाजाची चौकशी करून आवश्यक शिस्तभंगाची कारवाई करण्याचा समावेश आहे. या प्रकरणावर महापालिका प्रशासन कोणती भूमिका घेते आणि नागरिकांच्या तक्रारींवर काय निर्णय घेतला जातो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नावापुरती नारीशक्ती...



## भूमिका

**संसदेच्या विशेष अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर मांडण्यात येत असलेले महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाचे विधेयक प्रथमदर्शनी प्रगत आणि स्वागतार्ह वाटते. महिलांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी हे पाऊल महत्त्वाचे मानले जाऊ शकते.**



मात्र या विधेयकासोबत जोडले गेलेले इतर बदल लक्षात घेतले तर त्यामागील राजकीय हेतूंबाबत प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.

या प्रस्तावामध्ये लोकसभेतील खासदारांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवण्याचा विचार आहे. सध्याच्या तुलनेत ही वाढ देशाच्या आर्थिक आणि प्रशासकीय रचनेवर ताण आणणारी ठरू शकते. महिलांना आरक्षण देण्यासाठी खासदार संख्या वाढवणे आवश्यकच आहे का, हा मूलभूत प्रश्न आहे. विद्यमान जागांमध्येच आरक्षणाची अंमलबजावणी शक्य असताना अतिरिक्त प्रतिनिधींचा भार देशावर टाकणे कितपत योग्य, याचा विचार व्हायला हवा.

यापेक्षा अधिक चिंताजनक बाब म्हणजे मतदारसंघ पुनर्रचना आणि जनगणना यांचे नाते सैल करण्याचा प्रयत्न. भारतीय संविधानानुसार जनगणनेनंतरच मतदारसंघांची फेररचना करणे अपेक्षित आहे. मात्र, अद्याप पूर्णपणे अद्ययावत जनगणना उपलब्ध नसताना जुन्या आकडेवारीच्या आधारावर भविष्यातील प्रतिनिधित्व ठरवण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसते. गेल्या दशकात देशाच्या लोकसंख्येच्या रचनेत, स्थलांतरात आणि शहरीकरणात मोठे बदल झाले आहेत. अशा परिस्थितीत जुनी माहिती वापरून घेतलेले निर्णय वास्तवापासून दूर जाण्याची शक्यता निर्माण करतात.

या सर्व प्रक्रियेत प्रादेशिक असमतोल वाढण्याचीही भीती आहे. उत्तर भारतातील राज्यांमध्ये लोकसंख्या वाढ जास्त असल्याने त्या राज्यांचे प्रतिनिधित्व वाढण्याची शक्यता आहे, तर दक्षिणेकडील प्रगत आणि लोकसंख्या नियंत्रणात यशस्वी ठरलेल्या राज्यांना तुलनेने कमी प्रतिनिधित्व मिळू शकते. त्यामुळे संघराज्यीय संतुलन बिघडण्याचा धोका निर्माण होतो.

महिलांना राजकारणात अधिक संधी देणे हे नक्कीच आवश्यक आणि योग्य आहे. परंतु त्या नावाखाली इतर संरचनात्मक बदल रेटणे योग्य ठरत नाही. कोणत्याही धोरणामागे पारदर्शकता, तर्कसंगती आणि व्यापक राष्ट्रीय हित यांचा विचार असणे आवश्यक असते. अन्यथा चांगल्या उद्देशालाही संशयाची किनार लागते.

आज गरज आहे ती संतुलित आणि विवेकी निर्णयांची. महिलांचे सक्षमीकरण हे खऱ्या अर्थाने साध्य करायचे असेल तर ते राजकीय हेतूंवर नव्हे तर ठोस आणि न्याय्य धोरणांवर आधारित असले पाहिजे. अन्यथा 'नारीशक्ती' ही संकल्पना केवळ घोषणांपुरती मर्यादित राहण्याचा धोका आहे.

## प्रासंगिक »

### विचार !

**माणसाच्या अंगी नम्रता असावी. तसेच शब्दांचा जपून वापर करण्याचे तारतम्यही असावे. या साऱ्यांचा संगम ज्याच्या ठिकाणी असतो, त्याच्याच हातून मोठे कार्य घडते.**

ग्रामोफोनचा शोध लावणाऱ्या थॉमस अल्वा एडिसन या महान शास्त्रज्ञाच्या जीवनातील हा प्रसंग. त्याने ग्रामोफोनचा शोध लावला. यंत्राच्या मुखातून प्रथम शब्द बाहेर पडला. त्या काळाच्या दृष्टीने तो एक अद्भूत चमत्कारच होता. एका समारंभात कोणीतरी त्यांची ओळख करून देताना म्हटले, "हे थॉमस अल्वा एडिसन. त्यांनी बोलणारे यंत्र शोधून काढले." त्यावर एडिसनने नम्रपणे सांगितले की, "शब्द बोलणारे यंत्र परमेश्वराने शोधून काढले आहे. मी जे यंत्र शोधून काढलंय ते बोललेले शब्द थांबविण्याचं यंत्र आहे." अनेक शोध लावलेल्या त्या जगप्रसिद्ध शास्त्रज्ञाने वरील उद् गार काढले. कारण, त्याला शब्दांचे सामर्थ्य माहिती होते. ते जपून वापरले पाहिजेत. हे त्याला कळत होते आणि नम्रता तर त्याच्या नसानसांत होती.

**- तात्पर्य : बोलून विचार करण्यापेक्षा विचारांती नम्रपणे बोलावे.**

मुंबईतील एका संगीत कार्यक्रमात ड्रग्जच्या अतिसेवनामुळे दोन तरुणांचा मृत्यू झाला आणि राज्यातील अंमली पदार्थांच्या प्रश्नाने पुन्हा एकदा डोके वर काढले. मात्र हा प्रश्न नवीन नाही; तो अनेक वर्षांपासून वाढतच आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे अशा दुर्घटना घडल्यानंतरच यंत्रणा जागी होत असल्याचे दिसते.

# 'उडता महाराष्ट्र'? तरुणाई ड्रग्सच्या विळख्यात...



पूर्वी ड्रग्जचा प्रश्न मेट्रो शहरांपुरता मर्यादित होता, पण आता त्याने ग्रामीण भागातही पाय रोवले आहेत. मुंबई, पुणे, नाशिक, नागपूरसारख्या शहरांसह लहान शहरांमध्ये आणि गावांमध्येही ड्रग्ज सहज उपलब्ध होत आहेत. शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरातच या पदार्थांची विक्री होत असल्याचे अनेकदा समोर आले आहे. यामुळे तरुण पिढी व्यसनाधीनतेच्या विळख्यात अडकत आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे.

याहूनही चिंताजनक म्हणजे या सगळ्या प्रकाराकडे पोलिसांचे दुर्लक्ष. स्थानिक स्तरावर काय सुरू आहे याची माहिती पोलिसांना नसते, असे मानणे अवघड आहे. अनेक वेळा हप्त्यांच्या बदल्यात या गैरप्रकारांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते, असा आरोप वारंवार होत आहे. काही प्रकरणांमध्ये पोलिस आणि ड्रगमाफिया यांच्यातील संगनमतही उघड झाले आहे, ज्यामुळे परिस्थिती अधिकच भयावह बनते.

ललित पाटील प्रकरणाने हे वास्तव अधोरेखित केले. ड्रग्ज निर्मिती, साठवणूक आणि वितरणाचे जाळे किती खोलवर रुजले आहे, हे या घटनेतून स्पष्ट झाले. अगदी रुग्णालयातूनही ड्रग्ज रॅकेट चालवले जात होते, ही बाब धक्कादायक आहे. अशा घटनांमुळे कायदा आणि सुव्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होतो. आकडेवारी पाहता महाराष्ट्राची वाटचाल धोकादायक दिशेने सुरू असल्याचे स्पष्ट होते. 'उडता पंजाब'सारखी परिस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जर वेळीच कठोर पावले उचलली नाहीत, तर ही समस्या अधिकच गंभीर होऊ शकते. सरकार आणि पोलिस यंत्रणेने केवळ घोषणांवर न थांबता ठोस आणि प्रभावी कारवाई करणे अत्यावश्यक आहे. ड्रग्जच्या साखळीचा पूर्णपणे नायनाट करण्यासाठी कठोर कायदे, पारदर्शक अंमलबजावणी आणि जबाबदारी निश्चिती गरजेची आहे. त्याचबरोबर समाजानेही जागरूक राहून या विरोधात उभे राहणे आवश्यक आहे.

दोन तरुणांच्या मृत्यूने आपण हादरलो आहोत, पण हीच वेळ आहे जागे होण्याची. अन्यथा उद्या ही संख्या वाढत जाईल आणि आपण केवळ हतबलपणे पाहत राहू.

## ।। अभंगवाणी ।।



आतां कोठें धांवे मन ।
तुझे चरण देखिलिया ॥१॥

भाग गेला सीण गेला ।
अवघा जाला आनंद ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ‘TCS’ धर्मांतर प्रकरण सर्वोच्च न्यायालयात

## याचिकेत ‘दहशतवादी कृत्य’ म्हणत कठोर कारवाईचे निर्देश देण्याची विनंती

**महाईन्यूज । नाशिक**

**नाशिक येथील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसच्या बीपीओ केंद्रात उघडकीस आलेल्या धर्मांतर रॅकेट प्रकरणाने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. आता हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले आहे. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली असून, या प्रकरणाने देशाच्या विवेकाला हादरवून सोडले आहे आणि हा प्रकार दहशतवादी कृत्यात मोडतो असेही या याचिकेत म्हटले आहे. तसेच बेकायदेशीर धर्मांतर रोखण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी तातडीने कठोर पावले उचलावीत, असे निर्देश देण्याची विनंती या याचिकेद्वारे न्यायालयाकडे करण्यात आली आहे.**




धर्मांतराच्या प्रकरणांची स्वत:हून दखल घेत सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयात एक नवी याचिका दाखल करण्यात आली आहे. नाशिकमधील टिसीएस धर्मांतर प्रकरण ही एकमेव घटना नसून, ती एका मोठ्या, संघटित स्वरुपातील आणि बळजबरीने राबवल्या जाणाऱ्या मोहिमेचा भाग आहे, असा दावा या याचिकेत करण्यात आला आहे.

या याचिकेत असा युक्तीवाद करण्यात आला आहे की, जेव्हा बळाचा वापर करून किंवा प्रलोभने दाखवून एका स्ट्रक्चर्ड नेटवर्कच्या माध्यमातून धर्मांतर घडवून आणले जाते, तेव्हा तो एक सुनियोजित कट ठरतो. बहुतेकदा भारतामधील डेमोग्राफिक बॅलन्स बिघडवण्यासाठी अशा कृत्यांना परदेशातील संस्थांकडून निधी पुरवला जातो, असा आरोपही या याचिकेत करण्यात आला आहे.

अशी कृत्य देशाच्या एकात्मता धोक्यात आणतात आणि त्यामुळे अशी प्रकरणात दहशतवादाशी संबंधित कायद्यांनुसार कारवाई केली गेली पाहिजे, असे याचिकेत म्हटले आहे. तसेच संविधानातील तरतुदींचा दाखला देत याचिकेत या गोष्टीवर भर देण्यात आला आहे की, धर्माचे स्वातंत्र्याचा अधिकार हा निरपेक्ष नाही आणि तो सार्वजनिक व्यवस्था, नैतिकता आणि आरोग्य यांच्याशी निगडीत असतो.



बेकायदेशीर धर्मांतरांना आळा घालण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारनी कठोर पावले उचलावीत यासाठी त्यांना निर्देश देण्याची मागणी या याचिकेतून करण्यात आली आहे. तसेच फक्त अशा धर्मांतराशी संबंधित प्रकरणे हाताळण्यासाठी विशेष न्यायालयाची स्थापना करावी, जेणेकरून अशा प्रकरणात तपास आणि सुनावणी वेगाने पार पडेल, अशी विनंतीही करण्यात आली आहे.

मार्च महिन्यात नाशिकमधील ‘टीसीएस’च्या बीपीओ युनिटमधील एका महिला कर्मचाऱ्याने सहकाऱ्याविरोधात तक्रार दाखल केली. यात लग्नाचे आमिष दाखवून शारीरिक संबंध ठेवल्याचा गंभीर आरोप करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास करत असताना धक्कादायक माहिती समोर आली. २०२२ ते २०२६ या काळात अनेक महिला कर्मचाऱ्यांना मानसिक आणि लैंगिक त्रासाला सामोरे जावे लागल्याचे उघड झाले असून, याप्रकरणी आतापर्यंत ८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

नाशिक पोलीस आयुक्तालयाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे, फेब्रुवारी आणि मार्च २०२५ दरम्यान काही पोलीस कर्मचाऱ्यांनी चक्क ‘टीसीएस’मध्ये कर्मचारी म्हणून ‘अंडरकव्हर’ राहून पुरावे गोळा केले होते. सध्या सहायक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांच्या नेतृत्वाखालील विशेष तपास पथक (SIT) या प्रकरणाचा सखोल तपास करत आहे.

# चंद्रपुरातील ‘कोल वॉशरीज’वर मंत्री पंकजा मुंडेंचा कठोर कारवाईचा इशारा

**महाईन्यूज । चंद्रपुर**

**बेलसनी परिसरातील कोल वॉशरीजमुळे वाढत चाललेल्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी आज प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रदूषण पूर्णपणे कमी करण्यासाठी ठोस आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतील, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कोल वॉशरीजवर कठोर कारवाई केली जाईल, अशी ठाम ग्वाही दिली.**



विधानसभेत या गंभीर विषयाकडे लक्ष वेधत ज्येष्ठ नेते आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी कोल वॉशरीजमुळे होणाऱ्या प्रदूषणाचा मुद्दा प्रभावीपणे मांडला होता. त्यांच्या पाठपुराव्यामुळेच या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले गेले असून आजच्या पाहणी दौऱ्याद्वारे त्या आश्वासनाची पूर्तता होत असल्याचे दिसून आले. महामाया कोल वॉशरीजमुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या कापूस पिकावर मोठ्या प्रमाणात काळ्या धुळीचा थर साचून नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.

या पार्श्वभूमीवर कृषी विभाग, महसूल विभाग व प्रदूषण नियंत्रण विभाग यांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त समिती गठित करण्यात आली असून, त्यांच्या अहवालानुसार शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची कार्यवाही सुरू आहे. या पाहणीदरम्यान बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या की, “आज माझ्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर परिसरात स्वच्छता करण्यात आली असली, तरी ही तात्पुरती उपाययोजना असून पुढील भेटीदरम्यान प्रदूषणात लक्षणीय घट झालेली दिसली पाहिजे. यासाठी संबंधित यंत्रणांनी जबाबदारीने काम करावे.”

दरम्यान, आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष वेधताना सांगितले की, संयुक्त समितीच्या अहवालात सुमारे ६० ते ६५ टक्के नुकसान झाल्याचे नमूद करण्यात आले असून त्या अनुषंगाने नुकसानभरपाई देण्याची शिफारस करण्यात आली आहे. आज शेतकऱ्यांना नुकसानभरपाईचे धनादेश मिळतील, अशी अपेक्षा होती; मात्र प्रशासनाकडून अपेक्षित गती दिसून येत नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. “पंकजाताई या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालतील आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देतील, असा आम्हाला विश्वास आहे.

“सुधीरभाऊंच्या मार्गदर्शनाखाली या भागातील शेतकऱ्यांना दिलासा मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत,” असे पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले. या दौऱ्या दरम्यान जिल्हाधिकारी वसुमना पंत, मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प पुलकित सिंह, भाजप नेते राजेंद्र गांधी, ब्रिजभूषण पाझारे, अनिल डोंगरे, विक्की लाडसे, विजय आगरे,भारत रोहणे, बापूजी भोंगळे, पराग तूराणकर, शोभा पिदुरकर, तानेबाई वाघमारे सरपंच म्हातारदेवी आदींची उपस्थिती होती.

या पाहणी दौऱ्यामुळे बेलसनी परिसरातील प्रदूषणाच्या प्रश्नाला नवी दिशा मिळणार असून, लवकरच ठोस उपाययोजना आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# अमित शाह-अखिलेश यादव यांच्यात जुंपली

## धर्माच्या आधारावर मुस्लिमांना आरक्षण देणे घटनाबाह्य; गृहमंत्री अमित शाह

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**संसदेच्या विशेष अधिवेशनात महिला आरक्षणाशी निगडीत तीन विधेयकांवर चर्चेला सुरुवात झाली आहे. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी गुरुवारी लोकसभेत ती विधेयकं सादर केली. या विधेयकांना विरोधी पक्षांनी तीव्र विरोध केला आहे. काँग्रेस, समाजवादी पक्ष, एआयएमआयएम आणि बीजेडीसह अनेक विरोधी पक्षांनी या मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला विरोध केला. या विधेयकावरून अखिलेश यादव आणि केंद्रीय गृहमंत्री यांच्यात सभागृहात जोरदार खडाजंगी झाली.**





समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला जोरदार विरोध केला. अखिलेश यादव यांनी महिला विधेयकाला समर्थन देताना मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला विरोध असल्याचे स्पष्ट केले. जनगणना का होत नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. "कारण सरकारकडे आम्ही जातीय जनगणनेची मागणी करु आणि पुन्ही जातीच्या आधारावर आरक्षणाची मागणी करु म्हणून सरकार जनगणना करत नाही. भाजपाला धोक्याने पुन्हा सत्तेत यायचंय", असे अखिलेश यादव म्हणाले.

अखिलेश यादव यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर उत्तर देताना गृहमंत्री अमित शाह यांनी देशात जनगणना करण्याचे काम सुरु करण्यात आल्याचे स्पष्ट केले. तसेच, सरकारने जातीय जनगणनेचा निर्णय घेतला असून, जातीय जनगणना होत असल्याचे त्यांनी सभागृहात सांगितले. दरम्यान, जनगणनेच्या प्रक्रियेत जातीचा कॉलमच नसल्याचे सपाचे खासदार धर्मेंद्र यादव म्हणाले. यावर बोलताना, "सध्या घरांची गणती सुरु असून, घरांना जात नसते. ज्यावेळी नागरिकांची गणती सुरु होईल, त्यावेळी जातीचा कॉलम वाढविण्यात येईल", असे शाह यांनी स्पष्टे केले.

धर्मेंद्र यादव यांनी यावेळी बोलताना मुस्लिम महिलांना आरक्षण देण्याबद्दल भाष्य केले. यावर अमित शाह यांनी म्हणाले की, "हे घटनाबाह्य आहे. आपले संविधान धर्माच्या आधारावर आरक्षणाला मान्यता देत नाही. धर्माच्या आधारावर मुस्लिमांना आरक्षण देणे घटनाबाह्य आहे," असे शाह म्हणाले.

### अखिलेश आणि शाह समोरासमोर

अमित शाह यांच्या वक्तव्याला प्रत्युत्तर देताना, गृहमंत्री शाह यांनी असंवैधानिक वक्तव्य केल्याचे अखिलेश यादव मत नोंदवले. मुस्लिम महिला लोकसंख्येच्या प्रमाणात अर्ध्या नाहीत का? असा सवाल यादव यांनी उपस्थित केला. यावर बोलताना, "समाजवादी पक्षाने आपली सर्व तिकिटे मुस्लिम महिलांना द्यावीत. आमचा काय आक्षेप आहे?", असे खोचक प्रत्युत्तर शाह यांनी दिले.

# लष्कर-ए-तोयबाचा संस्थापक सदस्य अमीर हमजावर गोळीबार

**महाईन्यूज । लाहोर**

**लष्कर-ए-तोयबाचा संस्थापक सदस्य असलेला दहशतवादी अमीर हमजा याला लाहोरमध्ये अज्ञात बंदूकधाऱ्यांनी गोळ्या घातल्याची घटना समोर आली आहे. हमजाची प्रकृती सध्या चिंताजनक असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. लाहोर येथील एका वृत्तवाहिनीच्या कार्यालयाबाहेर अज्ञातांनी त्याच्यावर गोळ्या झाडल्या.**



लाहोर पोलिसांनी याबाबत दिलेल्या माहितीनुसार, "तहरीक-ए-हुरमत-ए-रसूल पाकिस्तानचे अध्यक्ष यांच्या गाडीवर लाहोरमधील हमदर्द चौकात अज्ञातांनी गोळीबार केला. गाडीतील सर्वजण सुरक्षित असले तरी अमीर हमजा याची तब्येत चिंताजनक आहे. गोळीबार कोणी केला? याचा शोध पोलिस घेत आहेत."

समोर आलेल्या अधिकच्या माहितीनुसार, लाहोर येथील एका वृत्तवाहिनीच्या कार्यालयाबाहेर काही अज्ञातांनी हमजा याच्यावर गोळीबार केला यात त्याला गंभीर दुखापत झाली आहे. त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे. गोळीबार झाल्यानंतर पोलिसांनी देखील त्याला प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला मात्र, अज्ञातांनी घटनास्थळावरुन पळ काढला, असे पोलिसांनी सांगितले आहे.

### लष्कर-ए-तोयबाचा संस्थापक सदस्य

दहशतवादी हाफीज सईद याच्यासह अमीर हमजा याने लष्कर-ए-तोयबाची स्थापना केली होती. अनेक दहशतवादी हल्ल्यांमध्ये त्याचा सहभाग असल्याचे वारंवार उघडकीस आले आहे. शिवाय भारतात देखील काही दहशतवादी कारवायांमध्ये त्याचा हात असल्याचे समोर आले आहे. भडकाऊ भाषणं आणि प्रक्षोभक लिखाणासाठी हमजाची ओळख आहे. त्याने अनेक वादग्रस्त पुस्तक आणि लेख प्रसिद्ध केल्याचे सांगितले जाते.

### नव्या दहशतवादी संघटनेची स्थापना

अमेरिकेने लष्कर-ए-तोयबावर कठोर निर्बंध लादले आहेत यात हमजाची दहशतवादी म्हणून नोंद करण्यात आली आहे. दहशतवादी संघटनेसाठी निधी गोळा करणे, त्यात तरुणांची भरती करणे आणि वाटाघाटी करण्यात हमजा पुढाकार घेत असल्याचे समोर आले आहे. २०१८ नंतर लष्कर-ए-तोयबापासून तो काहीसा लांब राहू लागला. त्याने जैश-ए-मानकाफा या दहशतवादी संघटनेची स्थापना केल्याचे सांगितले जाते.

# मधुबालाच्या बायोपिकसाठी शर्वरी वाघ आघाडीवर..



बॉलीवूडमधील दिग्गज अभिनेत्री मधुबाला यांच्या आयुष्यावर आधारित बायोपिक सध्या खूप चर्चेत आहे. या चित्रपटात मधुबालांची भूमिका कोण साकारणार, याबाबत अनेक अभिनेत्रींची नावे समोर येत आहेत. आता या यादीत अभिनेत्री शर्वरी वाघ हिचे नाव आघाडीवर असल्याचे समोर येत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, शर्वरीला या महत्त्वाच्या भूमिकेसाठी विचारले जात आहे. काही अहवालांमध्ये असेही म्हटले जात आहे की, ती या रोलसाठी टॉप चॉइसपैकी एक आहे. मात्र, अद्याप याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे शर्वरीची निवड निश्चित झाली आहे का, याबाबत अजून स्पष्टता नाही. मधुबालाच्या बायोपिकसाठी अनेक तरुण अभिनेत्रींची नावे चर्चेत होती. यात सारा अर्जुन, कल्याणी प्रियदर्शन, साई पल्लवी आणि अनीत पड्डा यांचा समावेश होता. या सर्व अभिनेत्रींपैकी अनीत पड्डा हिला सुरुवातीला मजबूत दावेदार मानले जात होते. पण आता शर्वरीचे नाव पुढे येत असल्यामुळे स्पर्धा अधिक रंगतदार झाली आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन जसमीत के. रीन करणार आहेत. त्यांनी यापूर्वी डार्लिंग्स या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते, ज्याला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे या बायोपिककडूनही मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. शर्वरीच्या कामाबद्दल बोलायचे झाले, तर ती सध्या अनेक मोठ्या प्रोजेक्ट्समध्ये व्यस्त आहे. ती लवकरच इम्तियाज अली यांच्या 'मैं वापस आऊंगा' या चित्रपटात दिसणार आहे. हा चित्रपट १२ जून २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. तसेच ती आलिया भट्ट सोबत 'अल्फा' या महिला जासूसी चित्रपटातही झळकणार आहे.



# सुरभी ज्योतीचे मॅटर्निटी फोटोशूट

छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्री सुरभी ज्योती लवकरच आई होणार आहे. लग्नानंतर सुमारे दीड वर्षांनी तिने आपल्या गरोदरपणाची माहिती चाहत्यांसोबत शेअर केली होती. ती सोशल मीडियावर अधूनमधून फोटो आणि व्हिडीओ शेअर करत आपल्या चाहत्यांना अपडेट देत असते. नुकतेच तिने सोशल मीडियावर बेबी बंप फ्लॉन्ट करत तिचे काही फोटो शेअर केले आहेत, ज्यात ती अत्यंत ग्लॅमरस अंदाजात दिसत आहे. सुरभी सध्या आपली पहिली प्रेग्नंसी एन्जॉय करत असून तिने नुकतेच तिचे मॅटर्निटी फोटोशूट केले आहे. या फोटोशूटसाठी तिने काळ्या रंगाचा बॉडीकॉन ड्रेस परिधान केला होता, ज्यात तिचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत होते. सोशल मीडियावर हे फोटो प्रचंड व्हायरल होत असून चाहते तिच्या या लूकवर कौतुकाचा वर्षाव करत आहेत. विशेष म्हणजे सुरभी एक नाही, तर जुळ्या बाळांना जन्म देणार असल्याची चर्चा आहे. तिच्या बेबी बंपवरील फोटो पाहून चाहत्यांनी आधीच तर्क लावायला सुरुवात केली आहे. सुरभीच्या करिअरबद्दल बोलायचे झाले तर, तिने अनेक लोकप्रिय मालिकांमध्ये काम केले आहे. 'कुबूल है', 'नागिन', 'गुनाह' आणि 'कोई लौट के आया है' या मालिकांमधून तिने प्रेक्षकांच्या मनात खास स्थान निर्माण केले आहे. तसेच काही वेबसीरिज आणि चित्रपटांमधूनही ती झळकली आहे.

# 'धुरंधर'ची यालिना आता साऊथमध्ये!



बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंहच्या 'धुरंधर' फ्रँचायझीने बॉक्स ऑफिसवर मोठा धमाका केला आहे. या चित्रपटातील प्रत्येक कलाकाराला प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिलं. विशेषतः सारा अर्जुन हिने साकारलेलं 'यालिना' हे पात्र प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलं. तिच्या अभिनयामुळे ती चांगलीच चर्चेत आली असून आता तिच्या करिअरला मोठं वळण मिळताना दिसत आहे. 'धुरंधर'नंतर सारा अर्जुनला एक मोठा साऊथ चित्रपट मिळाल्याची चर्चा आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ती आता साऊथ स्टार धनुषसोबत मुख्य अभिनेत्री म्हणून दिसू शकते. हा तिच्यासाठी खूप मोठा प्रोजेक्ट मानला जात आहे. त्यामुळे तिच्या चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. धनुष सध्या आपल्या 'कारा' या आगामी चित्रपटाच्या तयारीत व्यस्त आहे. हा चित्रपट ३० एप्रिलला प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन विग्नेश राजा यांनी केलं आहे. याशिवाय धनुषने आणखी एका नव्या प्रोजेक्टवर स्वाक्षरी केली आहे. हा चित्रपट 'लुबर पंधू'चे दिग्दर्शक तमिळरासन पचामुथू यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होणार आहे. याच चित्रपटात सारा अर्जुनला मुख्य अभिनेत्री म्हणून घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. महत्त्वाचं म्हणजे, या भूमिकेसाठी आधी 'कांतारा: चॅप्टर १' मधील अभिनेत्री रुक्मिणी वसंत हिचं नाव चर्चेत होतं. पण तिच्या व्यस्त वेळापत्रकामुळे ती या प्रोजेक्टमधून बाहेर पडली असल्याचं सांगितलं जात आहे. रुक्मिणी वसंत सध्या अनेक मोठ्या चित्रपटांमध्ये काम करत आहे. विशेष म्हणजे ती लवकरच ज्युनियर एनटीआरसोबत 'ड्रॅगन' या मोठ्या चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटासाठी तिने



आधीच बऱ्याच तारखा दिल्या असल्यामुळे इतर चित्रपटांसाठी वेळ देणं तिला शक्य झालं नाही. यामुळेच निर्मात्यांनी सारा अर्जुनला या भूमिकेसाठी निवडल्याची चर्चा सुरू आहे. मात्र, या बाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. पण 'धुरंधर'नंतर सारा अर्जुनच्या लोकप्रियतेत झालेली वाढ पाहता, तिला हा मोठा ब्रेक मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकंदरीत, 'धुरंधर'मुळे सारा अर्जुनला नवं व्यासपीठ मिळालं आहे आणि आता ती साऊथ इंडस्ट्रीत मोठी झेप घेण्याच्या तयारीत आहे. येत्या काळात तिची ही नवी जोडी प्रेक्षकांना किती आवडते, हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे.

# युवा अष्टपैलू खेळाडूचा संघात प्रवेश

## पराभवाच्या गर्तेत अडकलेल्या मुंबई इंडियन्सला नवा आधार

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**इंडियन प्रीमियर लीगच्या १९ व्या हंगामात (IPL 2026) सलग तीन पराभवांमुळे बॅकफूटवर गेलेल्या मुंबई इंडियन्सने संघात महत्त्वपूर्ण बदल केला आहे. दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर पडलेल्या अथर्व अंकोलेकरच्या जागी संघाने युवा अष्टपैलू खेळाडू कृष्ण भगत याला पाचारण केले आहे.**

खराब गोलंदाजीमुळे अडचणीत सापडलेल्या मुंबईला भगतच्या रूपाने एक नवा पर्याय आणि संघात संतुलन मिळण्याची अपेक्षा आहे.

अशा परिस्थितीत कृष्ण भगतची निवड ही मुंबईसाठी 'कमी जोखीम आणि जास्त फायदा' देणारी ठरू शकते. सलग तीन पराभवांनंतर पराभवाची हॅट्रिक पुसून काढण्यासाठी मुंबईला आता एका चमत्काराची गरज आहे. हा युवा अष्टपैलू खेळाडू आपल्या अष्टपैलू कामगिरीने मुंबई इंडियन्सला विजयाच्या मार्गावर परत आणणार का, याकडे आता चाहत्यांचे लक्ष



लागले आहे. मुंबई इंडियन्सने चालू हंगामासाठी डावखुरा फिरकीपटू अथर्व अंकोलेकरवर मोठी बोली लावली होती. मात्र, आयपीएल सुरू होण्यापूर्वीच रणजी करंडकादरम्यान त्याच्या गुडघ्याला गंभीर दुखापत (मेनिस्कस टियर) झाली. या दुखापतीनंतर त्याच्यावर शस्त्रक्रिया करावी लागल्याने त्याला संपूर्ण हंगामाला मुकावे लागले आहे.

### कोण आहे कृष्ण भगत

अथर्वची उणीव भरून काढण्यासाठी संघात स्थान मिळालेला कृष्ण भगत हा देशांतर्गत क्रिकेटमधील एक उदयोन्मुख अष्टपैलू खेळाडू आहे. पंजाबकडून खेळणाऱ्या या २१ वर्षीय खेळाडूने आतापर्यंत ७ प्रथम श्रेणी आणि ९ लिस्ट-ए सामने खेळले आहेत. तो उजव्या हाताने मध्यमगती गोलंदाजी करतो आणि मधल्या फळीत आक्रमक फलंदाजीसाठी ओळखला जातो. नुकत्याच झालेल्या विजय हजारे करंडकात त्याने ५१ धावांची वेगवान खेळी आणि एका सामन्यात ३ बळी घेत सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.




# कँडिडेट्समध्ये सिंदारोव्हचा डंका! गुकेशविरुद्ध विश्वविजेतेपदाची लढत रंगणार

**महाईन्यूज । सायप्रस**

**आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ विश्वात मोठी खळबळ उडवणारी घटना घडली आहे. उझबेकिस्तानचा तरुण ग्रँडमास्टर जावोखिर सिंदारोव्ह याने फिडे कँडिडेट्स स्पर्धेच्या खुल्या गटात दणदणीत कामगिरी करत विजेतेपद पटकावले आहे. मंगळवारी झालेल्या 13व्या फेरीत त्याने नेदरलँड्सच्या अनिश गिरी विरुद्धचा सामना बरोबरीत सोडवला आणि एक फेरी शिल्लक असतानाच विजेतेपद आपल्या नावावर केले.**



या विजयानंतर आता सिंदारोव्ह थेट भारताच्या विश्वविजेत्या डी. गुकेश विरुद्ध विश्वविजेतेपदासाठी भिडणार आहे.

सिंदारोव्हची ही कामगिरी केवळ विजयापुरती मर्यादित नाही, तर त्याने संपूर्ण स्पर्धेत एकही सामना न हरता इतिहास घडवला आहे. अवघ्या 20 वर्षांच्या या खेळाडूने 13 पैकी 6 सामने जिंकले, तर उर्वरित सामने बरोबरीत सोडवत एकूण 9.5 गुणांची कमाई केली. कँडिडेट्स स्पर्धेच्या इतिहासात इतकी स्थिर आणि अजेय कामगिरी यापूर्वी क्वचितच पाहायला मिळाली आहे. विशेष म्हणजे, काळ्या सोंगट्यांसह खेळताना त्याने गिरीसारख्या अनुभवी खेळाडूला रोखून धरले, ही त्याच्या आत्मविश्वासाची साक्ष आहे.

दुसऱ्या स्थानावर राहिलेल्या अनिश गिरीनेही चांगली लढत दिली, मात्र सिंदारोव्हने दोन गुणांची स्पष्ट आघाडी घेत त्याला मागे टाकले. या स्पर्धेत अनुभवी खेळाडूंना पुन्हा एकदा वर्चस्व सिद्ध करण्याची संधी होती. मात्र अमेरिकेचे दिग्गज फॅबियानो कॅरुआना आणि हिकारू नाकामुरा यांना अपेक्षित कामगिरी करता आली नाही. त्यांनी स्पर्धेत ठोस आव्हान निर्माण करण्यात अपयश आले.

दरम्यान, भारतीय बुद्धिबळासाठी अभिमानाची बाब म्हणजे डी. गुकेश आधीच विश्वविजेता बनला आहे. डिसेंबर 2024 मध्ये सिंगापूर येथे त्याने चीनच्या डिंग लिरेन याचा पराभव करून इतिहास रचला होता. अवघ्या 18व्या वर्षी विश्वविजेतेपद जिंकणारा तो सर्वात तरुण खेळाडू ठरला. त्याआधी त्याने एप्रिल 2024 मध्ये कँडिडेट्स स्पर्धा जिंकून स्वतःची ताकद दाखवली होती. आता सिंदारोव्हविरुद्ध त्याची होणारी लढत बुद्धिबळविश्वासाठी अत्यंत रोमांचक ठरणार आहे.

इतर सामन्यांमध्ये भारताच्या आर. प्रज्ञानंद याने कॅरुआनाविरुद्ध सामना बरोबरीत सोडवला, तर दिव्या देशमुख हिला लाग्नोकडून पराभव स्वीकारावा लागला.

एकंदरीत, यंदाची कँडिडेट्स स्पर्धा नव्या पिढीच्या उदयाची साक्ष देणारी ठरली आहे. सिंदारोव्ह आणि गुकेश यांच्यातील आगामी विश्वविजेतेपदाची लढत ही अनुभव विरुद्ध तरुणाई, रणनीती विरुद्ध धाडस यांचा संगम असणार आहे. बुद्धिबळप्रेमींसाठी ही एक पर्वणी ठरणार आहे.

### महिलांच्या गटातही चुरशीची लढत

महिलांच्या गटातही चुरशीची लढत सुरू आहे. भारताची आर. वैशाली हिने पराभवानंतर जोरदार पुनरागमन करत चीनच्या टॅन झोंगयी विरुद्धचा सामना बरोबरीत सोडवला. काळ्या सोंगट्यांनी खेळताना तिने संयमित खेळ करत 7.5 गुणांपर्यंत मजल मारली. सध्या ती कझाकस्तानच्या बिबिसारा असाउबायेव्हा सोबत संयुक्त आघाडीवर आहे. स्पर्धेच्या अखेरच्या फेरीत वैशालीचा सामना रशियाच्या कॅटेरिना लाग्नो हिच्याशी होणार आहे, जो विजेतेपदासाठी निर्णायक ठरू शकतो. दुसरीकडे, बिबिसाराने अनुभवी ॲना मुझिचुक हिचा पराभव करून आपली दावेदारी मजबूत केली आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। शुक्रवार ।

दि. 17 एप्रिल 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### सोसायटीधारकांचे लक्ष : बिनविरोध निवडणुकीसाठी पदाधिकाऱ्यांची चाचपणी

# पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनची निवडणूक २६ एप्रिलला निश्चित..!





**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील सुमारे ४० लाख पिंपरी-चिंचवडकर आणि सोसायटीधारकांच्या हक्कांसाठी कायम आग्रही असलेल्या पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्था महासंघ अर्थात सोसायटी फेडरेशनची निवडणूक येत्या रविवार दि. २६ एप्रिल २०२६ रोजी विशेष अधिमंडळ बैठकीत ही महत्त्वपूर्ण निवडणूक पार पडणार आहे.**

गेल्या अनेक महिन्यांपासून रखडलेल्या निवडणुकीसंदर्भात निर्माण झालेल्या अनिश्चिततेदरम्यान 'महाईन्यूज'ने सातत्याने "निवडणुकीला मुहूर्त कधी?" असा सवाल उपस्थित केला होता. त्यानंतर प्रशासन पातळीवर हालचालींना वेग येऊन अखेर निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

महासंघाच्या २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक कालावधीसाठी ११ जागांच्या व्यवस्थापन समितीची निवड या प्रक्रियेतून होणार आहे. वाकड येथील ग्रीन ड्राइव्ह रोडवरील मॅक्झीमा सहकारी गृहरचना संस्थेच्या क्लब हाऊसमध्ये सकाळी १० वाजता विशेष अधिमंडळ बैठकीस सुरुवात होणार आहे. ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सहकार विभागाचे निवडणूक निर्णय अधिकारी विलास नामदेव लिंबळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे.



पिंपरी चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थाचा महासंघ मर्यादित

द्वारा /पलाश सहकारी गृहरचना संस्था मर्या. स. न. 187, प्लॉट नं. 187 ग्रीन ड्राइव्ह रोड वाकड पुणे 411057

नोंदणी क्र.पीएनए/पीएन(3)/जीएनएल(ओ)/1898/सन 2017 दिनांक 07/08/2017

जा.क्र./निवडणूक/अधिमंडळ बैठक/सन 2026-27 प्रपत्र-1 दिनांक 10/04/2026

महाराष्ट्र सहकारी संस्था 1961 मधील नियम 60 अन्वये

(फक्त अंतिम मतदार यादीतील सभासंदासाठी)

अधिमंडळाची विशेष बैठकीची सुचना

पिंपरी चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थाचा महासंघ मर्यादित द्वारा /पलाश सहकारी गृहरचना संस्था मर्या.स.न.187,प्लॉट नं.187 ग्रीन ड्राइव्ह रोड वाकड पुणे 411057 या संस्थेच्या सर्व सभासद सभासदांना कळविण्यात येते की, जिसनिअपुशहर/निवडणूक/उ.नि.पु.शहर(3)/ड वर्ग/प्रा.अ./प्रा.अ.मान्यता/9939/2026 दिनांक 18/3/2026 चे आदेशानुसार माझी आपले संस्थेची संचालक मंडळ निवडणूक सन 2026 ते 2031 करीता निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती झालेली असल्याने त्यास अनुसरुन आपल्या संस्थेची अधिमंडळाची विशेष बैठक श्री.विलास नामदेव लिंबळे, सहकार शिक्षणाधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या,पुणे अधिन उपनिबंधक,सहकारी संस्था, पुणे शहर (3) यांचे अध्यक्षतेखाली रविवार दिनांक 26/04/2026 रोजी सकाळी 10.00 वाजता मॅक्झीमा सहकारी गृहरचना संस्था मर्या. वाकडचे क्लब हाऊस, ग्रीन ड्राइव्ह रोड वाकड पुणे 411057 येथे पुढील विषयावर विचार विनिमय करुन निर्णय घेण्यासाठी बोलविण्यात येत आहे.तरी अंतिम मतदार यादीतील सभासद संस्थांचे प्रतिनिधींनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

सभेपुढील विषय - पिंपरी चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थाचा महासंघ मर्यादित, वाकड पुणे 57 या सहकारी महासंघाची व्यवस्थापन समिती निवडणूक सन 2026 ते 2031 करीता उपविधीतील तरतुद 43 बी अन्वये खालील जागासांठी निवड करणे.

1) सर्वसाधारण मतदार संघ जागा - 11

विलास ना.लिंबळे
निवडणूक निर्णय अधिकारी/

सचिव
पिंपरी चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थाचा महासंघ मर्यादित

PIMPRI CHINCHWAD CO-OP. HOUSING SOCIETIES FEDERATION LTD. REGN. NO. PNA/PNA(…) GNAL (O) 1398/2017

## निवडणूक लांबणीवर का पडली होती?

महासंघाची निवडणूक काही प्रशासकीय आणि प्रक्रियात्मक कारणांमुळे लांबणीवर पडली होती. यामुळे महासंघाचे दैनंदिन कामकाज आणि निर्णय प्रक्रियेत अडथळे निर्माण झाल्याची चर्चा सभासदांमध्ये होती. अनेक महत्त्वाच्या निर्णयांवर परिणाम होत असल्याने सभासदांमध्ये असंतोषही वाढत होता. याच पार्श्वभूमीवर 'महाईन्यूज'ने या प्रश्नावर सातत्याने पाठपुरावा करत "निवडणुकीला मुहूर्त कधी?" असा थेट सवाल उपस्थित केला होता. त्यानंतर अखेर निवडणूक कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे.

## निवडणूक बिनविरोध?

निवडणूक निर्णय अधिकारी विलास लिंबळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व वेळबद्ध पद्धतीने राबवली जाणार आहे. आवश्यकतेनुसार निवडणूक कार्यक्रमात बदल करण्याचे अधिकार त्यांच्याकडे राखीव ठेवण्यात आले आहेत. पाच वर्षांसाठी महासंघाचे नेतृत्व कोणाकडे जाणार? याबाबत विविध गटांमध्ये चर्चा सुरू असून उमेदवारी अर्ज भरण्यासाठी हालचालींना वेग आला आहे. काही ठिकाणी पॅनल बांधणीचेही प्रयत्न सुरू झाले आहेत. मात्र, ही निवडणूक बिनविरोध होईल आणि त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दीर्घ प्रतीक्षेनंतर निवडणूक जाहीर झाल्याने सभासदांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. आता २६ एप्रिल रोजी होणाऱ्या या निवडणुकीकडे शहरातील सोसायटीधारकांचे लक्ष लागले आहे.

## एका दिवसात संपूर्ण निवडणूक प्रक्रिया..

निवडणूक निर्णय अधिकारी विलास लिंबळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया एका दिवसात टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जाणार आहे. दि.२६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते ११ या वेळेत अंतिम मतदार यादीतील सभासदांकडून नामनिर्देशन अर्ज स्वीकारले जातील. त्यानंतर ११ ते ११.३० या वेळेत अर्जांची छाननी केली जाईल. छाननीनंतर पात्र उमेदवारांची नावे ११.३० ते १२ या वेळेत जाहीर करण्यात येतील. त्यानंतर १२ ते १२.३० या वेळेत इच्छुक उमेदवारांना नामनिर्देशन अर्ज माघारी घेण्याची संधी दिली जाणार आहे. त्यानंतर १२.३० ते १ या वेळेत अंतिम उमेदवारांची यादी जाहीर केली जाईल. जर निवडणूक बिनविरोध झाली नाही, तर दुपारी १.३० ते ३ या वेळेत मतदान प्रक्रिया राबवली जाणार आहे. मतदान पूर्ण झाल्यानंतर लगेच मतमोजणी करून निकाल जाहीर केला जाईल, असेही विलास लिंबळे यांनी स्पष्ट केले.

# डुडूळगाव येथील राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी

## इयत्ता १०वीचा CBSE परीक्षा निकाल यंदा १००%; संस्थेचा अभिमान

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**डुडूळगाव येथील राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या डुडूळगाव शैक्षणिक संकुलातील 'ज्ञानभक्ती इंटरनॅशनल स्कूल' या शाळेचा इयत्ता १०वीचा CBSE परीक्षा निकाल यंदा १००% लागला आहे. सर्व विद्यार्थ्यांनी यश संपादन करून संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. हि कौतुकास्पद बाब आहे .**



या निकालात कु.मयुरी मस्करे (91.2%),कु.श्रेया खोत (91%) कु. हर्षिता सूर्यवंशी (91%), कु.श्रद्धा सोळंकी (91.2%), साई सतीश पाटील (90.2%), लुकेश निलेश नेहेते (90%) विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवत विशेष प्राविण्य मिळवले आहे. शाळेतील एकूण 71 विद्यार्थ्यांपैकी 56 विद्यार्थ्यांना वैयक्तिक विषयांमध्ये 90 पेक्षा जास्त मार्क मिळालेले आहेत. ही सुद्धा एक कौतुकास्पद बाब आहे विद्यार्थ्यांच्या या यशासाठी शिक्षकांचे मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव, संस्था आणि पालकांचा पाठिंबा महत्त्वाचा ठरल्याचे प्राचार्या डॉ. उर्मिला जाधव यांनी सांगितले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व भोसरी विधानसभेचे प्रथम आमदार मा. श्री. विलासराव लांडे, सचिव श्री. सुधीर मुंगसे, कोषाध्यक्ष श्री. अजित गव्हाणे तसेच विश्वस्त श्री. विक्रांत लांडे व प्रा. श्री. किरण चौधरी, श्री. प्रमोद बोचरे, रजिस्ट्रार सौ.अश्विनी चव्हाण यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले. या यशाचे श्रेय प्राचार्या डॉ. उर्मिला जाधव, समन्वयिका सौ. कल्याणी केन्हाळकर, सौ. अमृता विळसकर व सर्व शिक्षक यांच्या मार्गदर्शनाला जाते. तसेच यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शाळेची इयत्ता 10 वी ची ही पहिली बॅच आहे. संस्थेच्या या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण परिसरात कौतुकाची लाट उसळली असून विद्यार्थ्यांसाठी हे यश प्रेरणादायी ठरत आहे.

# एकात्मिक विकासासाठी पीएमआरडीए अन् पीसीएमसी एकसाथ!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**“पिंपरी-चिंचवड शहर आणि परिसराच्या एकात्मिक विकासासाठी दोन्ही संस्थांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे,” असे प्रतिपादन डॉ. विजय सूर्यवंशी यांनी बैठकीत केले.**




आकुर्डी येथील पीएमआरडीए मुख्यालयाला पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा पीएमआरडीएचे अतिरिक्त पदभार असलेले डॉ. विजय सूर्यवंशी यांनी मंगळवारी (दि. १५ एप्रिल) भेट देत विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. महापालिका आणि प्राधिकरण यांच्यातील सामायिक विकास प्रकल्पांना गती देणे आणि समन्वय अधिक मजबूत करणे यावर त्यांनी विशेष भर दिला.

यावेळी अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी, सहआयुक्त (प्रशासन) रूपाली आवले-डंबे, सहआयुक्त (जमीन व मालमत्ता) पूनम मेहता, उपायुक्त हिंमत खराडे, मुख्य अभियंता रिनाज पठाण, विकास परवानगी विभाग संचालक अविनाश पाटील, मुख्य अभियंता शिवप्रसाद बागडी, मुख्य वित्तीय नियंत्रक जितेंद्र कोळंबे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### संयुक्त प्रकल्पांमध्ये सुसूत्रता आणणार..!

या आढावा बैठकीत अभियांत्रिकी विभागामार्फत सुरू असलेल्या विविध प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. प्रलंबित कामांचा आढावा घेताना, प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन विकासकामे वेगाने पूर्ण करावीत, असे स्पष्ट निर्देश डॉ. सूर्यवंशी यांनी अधिकाऱ्यांना दिले. बैठकीत प्रकल्प समन्वय सुधारण्यावर विशेष चर्चा झाली. पीएमआरडीए आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या संयुक्त प्रकल्पांमध्ये सुसूत्रता आणून त्यांची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

# पिंपरी-चिंचवडच्या विकासाला गती

## पायाभूत सुविधा, आरोग्य आणि शिक्षणाशी संबंधित विकासकामांना 'स्थायी'ची मंजुरी!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधूकर पवळे सभागृहात पार पडली. सभेच्या सुरुवातीला दिवंगत गायिका पद्मविभूषण आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर सभेच्या कामकाजाला सुरुवात झाली.**



यावेळी स्थायी समिती सदस्यांसह महापालिका आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, नगरसचिव मुकेश कोळप यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेत शहरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण व प्रशासनाशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण विषयांना मंजुरी देण्यात आली. विशेषतः झोपडपट्टी व दाट वस्ती भागांमध्ये गटर करणे, स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे, शौचालयांची दुरुस्ती, रंगरंगोटी व मनपा इमारतींची देखभाल यांसारखी कामे ह, अ, ब, क, ड, इ, फ व ग क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सिद्धार्थनगर, गुलाबनगर, जयभीमनगर, महात्मा फुलेनगर, भारतमातानगर, राजीव गांधीनगर, विद्यानगर, दत्तनगर, शंकरनगर, इंदियानगर, काळभोरनगर, गांधीनगर, बालाजीनगर, संजय गांधीनगर, शांतीनगर आदी परिसरांमध्ये स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ अंतर्गत मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येणार आहेत.


शहरातील रस्ते व वाहतूक सुधारण्यासाठी निगडी-दापोडी रस्त्यावरील बसस्थानक व डेडिकेटेड लेन दुरुस्ती, सांगवी-किवळे रस्त्याचे डांबरीकरण, निगडी टिळक चौक ते दुर्गानगर रस्त्यावरील कामे, तसेच प्रभाग क्र.२ मधील चिखली महादेवनगर, रोकडेवस्ती, मोशी व जाधववाडी परिसरातील अंतर्गत रस्त्यांचे हॉटमिक्स व बीबीएम पद्धतीने डांबरीकरण करण्यास मान्यता देण्यात आली. प्रभाग क्र.१६ मधील रावेत, वाल्हेकरवाडी व किवळे येथील रस्त्यांची दुरुस्ती, प्रभाग क्र.२४ मधील सदाशिव कॉलनी, श्रीकृष्ण कॉलनी, आनंद पार्क परिसरातील रस्ते कॉंक्रीटीकरण, तसेच प्रभाग क्र.२५ मधील वाकड, पुनावळे, ताथवडे भागांमध्ये विविध विकासकामे करण्यात येणार आहेत. पिंपळे निलख, विशालनगर, कस्पटेवस्ती, वेनुनगर, कावेरीनगर परिसरात पावसाळी पाण्याच्या लाईनची दुरुस्ती व नवीन पाईपलाईन टाकणे, तसेच फूटपाथ व पेव्हिंग ब्लॉक दुरुस्तीची कामेही हाती घेण्यात येणार आहेत.

वाहतूक व नागरी नियोजनाच्या दृष्टीने पिंपळे सौदागर येथील पीके चौक सिग्नल फ्री करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार नेमणे, तसेच पिंपळे गुरव येथील वाकड ते नाशिक फाटा रस्त्यावर कल्पतरू चौकात सबवे उभारण्यासाठी सल्लागार नेमण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच प्रभाग क्र.२७ मधील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात रेलिंग करणे व मनपा शाळांमधील स्थापत्य विषयक कामेही करण्यात येणार आहेत. आरोग्य सेवांच्या बळकटीकरणासाठी कै. प्रभाकर मल्हारराव कुटे स्मृती रुग्णालय, आकुर्डी व नवीन भोसरी रुग्णालयातील क्ष-किरण विभागासाठी बॅटरी खरेदी, जैववैद्यकीय घनकचरा व्यवस्थापन, तसेच नवीन थेरगाव गावठाण येथे ३४० खाटांच्या मल्टीस्पेशालिटी रुग्णालयासाठी फर्निचर खरेदीस मान्यता देण्यात आली. याशिवाय यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात मानधन तत्त्वावर विविध पदांची भरती करण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. आरोग्य विभागासाठी ४ सक्शन युनिट वाहने व प्रत्येकी २ मजूर उपलब्ध करून देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. महापालिकेच्या प्रशासकीय व शैक्षणिक कामकाजासाठी महत्त्वाचे निर्णय घेत मनपा शाळांमध्ये १३८ डेटा एन्ट्री ऑपरेटर (प्राथमिक १२० व माध्यमिक १८) २४ महिन्यांसाठी नेमण्यास, विद्यार्थ्यांच्या परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, प्रगतीपुस्तके व प्रवेश फॉर्म छपाईस, तसेच संगणकीय केबल नेटवर्क उभारणीस मान्यता देण्यात आली. महापालिकेचा विकास आराखडा मराठी भाषेत प्रसिद्ध करण्यासाठी येणाऱ्या खर्चासही मंजुरी मिळाली . तसेच ई-मेल अकाऊंटचे नूतनीकरण व दैनंदिन देखभाल कामास मुदतवाढ देण्यात आली आहे. स्वच्छता व पर्यावरणाच्या दृष्टीने शौचालय साफसफाई व देखभाल करणाऱ्या महिला बचत गटांना ६ महिन्यांऐवजी ११ महिन्यांची मुदतवाढ, त्यांच्या मानधनात वाढ, तसेच शून्य कचरा प्रकल्पांतर्गत मे. आसरा सोशल फाऊंडेशन संस्थेस १७ शाळांमध्ये प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात आली. श्रीकृष्ण महिला बचत गटाच्या वेतन खर्चासही मंजुरी देण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या कामकाजासाठी वाहन भाडेतत्वावर घेणे, अग्निशमन विभागातील वाहनांची दुरुस्ती, प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील फायर सेफ्टी ऑडिटनुसार कामे, स्मशानभूमींमध्ये चिमणी बसविणे, रस्ते दुभाजकांची देखभाल, गटार व रस्ते साफसफाई, अतिक्रमण व अनधिकृत बांधकामांवर कारवाई, आपत्ती व्यवस्थापनासाठी यंत्रसामग्री या कामांसाठीही खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

# आर. के. एल. गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूलचा १० वीचा निकाल १०० टक्के!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**वडमुखवाडी (आळंदी रोड) येथील आर. के. एल. गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूलने (RKLGIS) सीबीएसई १० वी बोर्ड परीक्षेत यंदाही देदीप्यमान यश संपादन केले आहे. शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून, निम्म्याहून अधिक विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवून 'अनस्टॉपेबल एक्सलन्स'चे दर्शन घडवले आहे.**




१००% निकाल: शाळेतील सर्व विद्यार्थी विशेष श्रेणीत (DISTINCTION) उत्तीर्ण झाले आहेत.एकूण बॅचपैकी ५०% विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवले आहेत. शाळेचे टॉपर सई तापकीर ९७% गुणांसह प्रथम, तर रुचीता छाजेड हिने ९६.४% गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या वतीने आणि शिक्षकांकडून त्यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. "केवळ मार्क मिळवणे हे आमचे उद्दिष्ट नसून, विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या जिद्द आणि कष्टाला योग्य दिशा देणे हेच आमच्या यशाचे गमक आहे," अशा शब्दांत शाळेने आनंद व्यक्त केला आहे.

या यशाबद्दल परिसरातील नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या पालकांकडून विद्यार्थ्यांचे व शाळेच्या व्यवस्थापन समितीचे अभिनंदन होत आहे.

### गुणवंत विद्यार्थी...

शाळेतील वेदांत घाईत, नेत्रा बोरगावकर आणि ऋतुराज पाटील यांनी प्रत्येकी ९६% गुण मिळवले आहेत. प्रणीत पवार (९५%), समिधा जाधव (९४%) आणि प्रेयांश साहू (९४%) यांनीही उत्कृष्ट कामगिरी केली. याशिवाय पूर्वा पुणसे, शिवम निकम, आयुष देशमुख, निमिर्ती साळुंखे, अभिनव ठाकरे, श्रावणी शिंदे, इफ्रा मल्लादी, प्रथमेश बालटे, ध्रुव गोमे आणि आयुष बोरले यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

# RKL GALAXY INTERNATIONAL SCHOOL


CBSE 10th Board Results 25-2026

**Beyond Marks,** Our Students Delivered Pure, **Unstoppable Excellence.**

RKL GALAXY™
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

Over Half the Batch,
**50% students scored**
**Above 90%**

All Students passed
**above Distinction**
**100% Results**







Heartiest Congratulations to all our bright achievers!

Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune | 8698360005 | 9637339988

www.rklgis.org rklgis RKLGalaxyInternationalSchool